// शासकीय तंत्रनिकेतन खामगाव
जलंब रोड खामगाव
☎ (07263) 295011 (O), 295022 (P),
E-mail:office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in

क्र. शातंनिखा./उपहारगृह निविदा जाहिरात/२०२५/1626
दिनांक. 14 JUL 2025

प्रति,
मा. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती

विषय: निविदा जाहिरात आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बाबत

मा. महोदय,

उपरोक्त विषयान्वये, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेतील उपहारगृहसाठी सेवापूरविण्याकरिता करिता दि. २१/०७/२०२५ ते ११/०८/२०२५ या कालावधीमध्ये निविदा मागविण्यात येत आहे. करिता सदर निविदेची जाहिरात आपल्या संकेंतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी हि विनंती.

सहपत्र: निविदा जाहिरात

14/07/25

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन खामगाव

सहसंचालक, तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र.3208 दिनांक 16/7/25

# शासकीय तंत्रनिकेतन खामगाव

जलंब रोड खामगाव

☎ (07263) 295011 (O), 295022 (P),

E-mail:office.gpkhamgaon@dtemaharashtra.gov.in


क्र. शातंनिखा./उपहारगृह निविदा जाहिरात/२०२५/1626

दिनांक . 14 JUL 2025

## निविदा जाहिरात

**विषय: शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेतील उपहारगृहसाठी सेवा पुरवण्याबाबत**

शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेतील विद्यार्थी संख्या अंदाजे १२०० व अधिकारी/कर्मचारी यांची संख्या अंदाजे १०० आहे. त्याकरिता उपहारगृह सेवा पूरविण्याबाबत अनुभवी कंत्राटदाराकडून अभिव्यक्ती स्वारस्य/निविदा मागविण्यात येत आहे. निविदाबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**निविदाबाबतची माहिती:**

| | |
|---|---|
| १. कोऱ्या निविदेची किंमत(निविदा अर्ज): | रु.१००/- (नापरतावा) |
| २. बिनव्याजी बयाना(EMD) रक्कम | रु. २०००/- (परतावा) |
| ३. बिनव्याजी सुरक्षा ठेव | रु. १०००००/- |
| ४. निविदेचा कालावधी | दि. २१/०७/२०२५ ते ११/०८/२०२५ |
| ५. निविदा सादर करावयाची अंतिम तारीख व वेळ | दि. ११/०८/२०२५ साय. ०५.०० पर्यंत |
| ६. निविदेतील लिफाफे उघडण्याची तारीख व वेळ | १२/०८/२०२५ दु. ०३.०० वाजता |
| ७. कोऱ्या निविदा मिळण्याचे ठिकाण | श्री. एस. डब्लू. चोपडे, अधि. विद्युत अभि. |
| ८. कोऱ्या निविदा चा शुल्क भरण्याचे ठिकाण | रोखपाल, (कार्यालय शासकीय तंत्रनिकेतन खामगाव) |
| ९. भरलेले सीलबंद निविदा लिफाफा(लिफाफा क्र. १, २) जमा करावयाचे ठिकाण | कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, जलंब रोड, खामगाव, ता. खामगाव, जिल्हा: बुलडाणा- ४४४३०३ |

**निविदा जमा करण्यासाठी सूचना खालील प्रमाणे आहे.**

**सीलबंद लिफाफा क्रमांक १ मध्ये प्रपत्र अ व आवश्यक नमूद कागदपत्रे तसेच निविदा अर्ज शुल्क भरणा पावती, बयाना रक्कम धनाकर्ष, घोषणापत्र ठेवावे. सीलबंद लिफाफा क्र.१ वर प्रपत्र अ व**

**कागदपत्रे असे नमूद करावे. तसेच सीलबंद लिफाफा क्रमांक २ मध्ये प्रपत्र ब ठेवावे व सदर लिफाफ्यावर लिफाफा क्र.२ प्रपत्र ब दरपत्रक असे नमूद करावे. सदर दोन्ही लिफाफे एका मोठ्या लिफाफ्यामध्ये सीलबंद करून त्यावर "शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेसाठीच्या उपहारगृहासाठी सेवा पूरविण्याबाबत निविदा" असे नमूद करून लिफाफा संस्थेच्या कार्यालयात विहित कालावधीत जमा करावा. विहित कालावधीत प्राप्त न होणाऱ्या निविदेचा विचार केल्या जाणार नाही. तसेच टपालाद्वारे विहित कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या निविदेचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्राच्या पडताळणीसाठी लिफाफा क्र. १ (प्रपत्र अ व कागदपत्रे) उघडण्यात येऊन निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल. आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. जे निविदाधारक उपरोक्त प्रक्रियेदरम्यान उपस्थित राहू इच्छीतात त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहावे. फक्त पात्र निविदाधारकांचे लिफाफा क्रमांक-२ (प्रपत्र ब दरपत्रक) उघडल्या जाईल. दोन किंवा अधिक निविदाधारकांचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलविले जाईल व त्याआधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार उपहारगृह समितीस राहतील.

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने असणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफे उघडल्यावर समितीने मागणी केल्यास सर्व मुळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. **निविदा भरण्यापूर्वी निविदा धारकाने उपहारगृहची पाहणी करावी. पाहणी करण्यास आपण या संस्थेचे उपहारगृह समिती अध्यक्ष श्री. एस. व्ही. कुलकर्णी (विभाग नियंत्रक विज्ञान विभाग) यांच्याशी संपर्क साधावा.**

कोणत्याही क्षणी निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांना राहील.

शासकीय तंत्रनिकेतन खामगाव सत्यमेव जयते

14/07/25

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन खामगाव

## उपहारगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत नियम, अटी व शर्ती

1. उपहारगृहात पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांची गुणवत्ता नियमितपणे तपासण्यात यावी.
2. उपहारगृह चालविण्यासाठीचा सेवा पुरवठा आदेश मिळाल्यानंतर दहा दिवसात उपहारगृह सुरू करणे बंधनकारक राहील.
3. उपहारगृहातील सेवा विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी ऐच्छीक असेल, तसेच उपहारगृहातील सेवा मागणीनुसार अभ्यागतांना उपलब्ध करून देणे बंधनकारक असेल.
4. संस्थेतर्फे स्वयंकपाकघर, भोजनकक्ष, पाणी व विद्युत पुरवठा इत्यादी सुविधा पुरविण्यात येतील, परंतु उपहारगृह चालकाने प्रतिमाह विज बिल स्वत: भरणे बंधनकारक राहील.
5. **उपहारगृह चालकास प्रथम वर्षात प्रतिमाह रू ८५६०/-.(संस्था स्थापित असलेल्या मुख्यालयातील शासकीय नियमानुसार आकारण्यात येणारे) भाडे संस्थेत भरावे लागेल, त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षात 10 टक्के वाढीव भाडे, भरावे लागेल.**
6. **उपहारगृहासाठी अनामत रक्कम रू 1,00,000/– (अक्षरी रू. एक लाख) इतकी रककम धनादेश/धनाकर्ष द्वारे संस्थेत भरावी लागेल. अनामत रक्कम भरल्यानंतर रू 500/– च्या स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मान्य झाल्यानंतरच करार अस्तित्वात येईल, याची नोंद घ्यावी.**
7. कराराची मुदत निविदा मान्य झाल्यापासून तीन वर्षासाठी असेल, करार कालावधी मध्ये उपहारगृह चालकाची सेवा व दर्जा मानकाप्रमाणे नसल्यास आणि दोनदा सूचना देऊनही मानकाप्रमाणे दर्जा सुधारला नाहीतर पुढील प्रत्येक प्रकरणी उपहारगृह चालकास रू 2,000/–. इतका दंड आकारण्यात येईल आणि वारंवार सूचना देऊनही मानकाप्रमाणे दर्जा सुधारला नाहीतर सेवा खंडीत करण्याचे अधिकार किवा संपूर्ण वर्षातील कामकाजाचे मूल्यमापन करून पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन खामगांव यांना राहतील. सदरील सेवा खंडित करण्यासाठी 30 दिवसांची आगाऊ सूचना उपहारगृह चालकास देण्यात येईल, तसेच उपहारगृह चालकाला सेवा खंडित करावयाची असल्यास 90 दिवसांची आगाऊ सूचना उपहारगृह समिती, शासकीय तंत्रनिकेतन खामगांव यांना देणे बंधनकारक राहील.
8. उपहारगृहातील ओल्या व सुक्या कचऱ्याची स्वतंत्र विल्हेवाट लावण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील. सांडपाण्याच्या ड्रेनेजमध्ये उपहारगृहाचा कचरा आढळल्यास त्याच्या साफसफाई साठीचा खर्च उपहारगृह चालकास करावा लागेल, तसेच उपहारगृहा सभोवतीचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची असेल.
9. उपहारगृहामध्ये मदयपान/धुम्रपान व इतर अमली पदार्थाचे सेवन करण्यास अथवा करू देण्यास सक्त मनाई असेल, सदरील बाब उपहारगृह समितीस निदर्शनास आल्यास उपहारगृह चालकास रू. 2,000/– इतका दंड आकारण्यात येईल आणि वारंवार सूचना देऊनही सुधारणा न झाल्यास सेवा खंडीत करण्याचे अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगांव यांना राहतील.
10. संस्थेतील उपहारगृह समिती उपहारगृहास आकस्मिक भेट देवून खाद्यपदार्थ, स्वच्छता, मानकांनुसार दर्जा तसेच सेवाबाबत तपासणी करतील, त्यानुसार प्राचार्याच्या सुचनेप्रमाणे दर्जा सुधारणे उपहारगृह चालकास बंधनकारक राहील.
11. उपहारगृहाचा उपयोग निवासस्थान म्हणून करता येणार नाही.
12. उपहारगृहाची वेळ सकाळी 8:00 ते संध्याकाळी 7:00 वाजेपर्यंत अशी राहील.
13. संस्थेच्या परिसरात बैठका व इतर कार्यक्रमाच्या वेळी मागणीनुसार उपहारगृहाच्या सेवा पुरवणे बंधनकारक राहील.
14. उपहारगृहात बाल कामगार कायदयानुसार बाल कामगार ठेवता येणार नाहीत.

15. उपहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे बंधनकारक राहील

16. उपहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण माहिती संस्थेमध्ये सादर करावी लागेल. तसेच उपहारगृहातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरूध्द कोणताही गुन्हा पोलीस स्टेशन मध्ये दाखल नाही, याची खात्रीही दयावी लागेल. नवीन कर्मचारी नियुक्तीच्या आधी त्याबाबतची परवानगी संस्थेकडून घ्यावी लागेल.

17. करार कालावधीत कोणत्याही कारणास्तव उपहारगृह चालकाची सेवा खंडित करण्यात आली व नवीन उपहारगृह चालकाची नियुक्ती करून काम करून घ्यावे लागले तर अशा वाढीव खर्चाची वसुली जुन्या उपहारगृह चालकाच्या सुरक्षा रक्कमेतून करण्यात येईल.

18. उपहारगृहातील आणि भोजन कक्षातील वॉश बेसीन, पंखे, खिडक्या, दिवे, टाईल्स, फरश्या, खुर्च्या व टेबल स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील.

19. या करारान्वये सोपविण्यात आलेले उपहारगृह चालकास इतर कोणत्याही कंत्राटदाराकडे अथवा एजन्सीकडे हस्तांतरीत करता येणार नाही व सोपविताही येणार नाही. सदरील बाब उपहागृह समितीस निदर्शनास आल्यास सेवा खंडीत करण्याचे अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगांव यांना राहतील.

20. उपहारगृह सेवा पुरविण्याचा करार खामगांव शहरापुरताच न्यायाधिकार कक्ष (Legal Jurisdiction) मर्यादित राहील.

21. उपहारगृह चालकाने स्वतःच्या खर्चाने स्वयंपाकगृहाचा पूर्णभाग, स्वयंपाक गृहाचा ओटा, भांडी धुण्याची जागा, धान्यांचे भांडारगृह, गॅसस्टोरेज, स्वयंपाकगृहाच्या टाईल्स तसेच ओटा/फ्लॅटफॉर्म नियमितपणे स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. कोणत्याही प्रकारची दुर्गंधी, घाणेरडे डाग भिंतीवर अथवा फरशीवर असता कामा नये. स्वच्छतेसाठी Standard Cleaning Material चा वापर करावा. दोनदा सूचना देऊनही अस्वच्छता दिसून आल्यास रू 1,000/- इतका दंड आकारण्यात येईल.

22. उरलेले शिळे अन्न/खरकटे ब्लॅक प्लास्टिक डिस्पोजेबल बॅगमध्ये बंद करून त्याची विल्हेवाट शासकीय तंत्रनिकेतन खामगांव इमारतीच्या आवाराबाहेर **करण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची असेल.** कचऱ्याची विल्हेवाट लावताना नगरपालिकेकडुन कोणत्याही स्वरूपाची तक्रार आल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी सर्वस्वी उपहारगृह चालकाची राहील. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न केल्यास रू 1,000/- दंड आकारण्यात येईल.

23. उपहारगृह चालकानी सेवा पूरविताना अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि सर्व सेवांमध्ये कोणत्याही वेळी कोणत्याही प्रकारची कमतरता न करता सातत्यांने, उच्च दर्जाची सेवा पुरविणे आवश्यक राहील.

24. आजारी विद्यार्थ्यांकरीता त्यांच्या आवश्यकतेनुसार खाद्यपदार्थ त्यांना वसतिगृहामध्ये पोचविणे.

25. उपहारगृहासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलिंडरची व्यवस्था व खर्च स्वतः उपहारगृह चालकास करावा लागेल. तसेच गॅस सिलेंडर/पाईपलाईन याबाबत काही दुर्घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील व संस्था कोणत्याही प्रकारे सदरील बाबत जबाबदार असणार नाही, याची उपहारगृह चालकाने नोंद घ्यावी, तसेच याबाबत होणारा खर्च उपहारगृह चालकास करणे बंधनकारक राहील.

शासकीय तंत्र निकेतन खामगांव सत्यमेव जयते

14/07/25

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन खामगांव

नमुना अर्ज

# प्रपत्र अ

## शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेतील उपहारगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत तांत्रिक कागदपत्रे

१. अर्जदाराचे/संस्थेचे नाव:.................................................................................

२. अर्जदार/संस्थेचा पूर्ण पत्ता:...........................................................................

.........................................................................

३. मोबाईल न. .......................................................................................

४. ईमेल: .................................................................................................

५. आवश्यक पात्रता संबंधित कागदपत्रे(लिफाफा क्र. १ मध्ये ठेवावी)

i) उपहारगृह चालविण्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव प्रमाणपत्र

ii) शॉप अक्ट (shop act) परवाना (मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्थेची नोंदणी प्रमाणपत्र)

iii) अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र शासनाच्या अन्न सुरक्षा मानके अधिनियम २००६ अंतर्गत परवाना.

iv) नगरपालिका/महानगरपालिका परवाना

v) PAN/TAN/TIN नो. नोंदणी प्रमाणपत्र

vi) मागील आर्थिक वर्षाचे आयकर भरल्याचा पुरावा जोडावा अथवा वार्षिक आर्थिक उलाढाल यासाठी खर्च उत्पन्न किंवा सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र

vii) निविदा शुल्क भरणा केल्याची पावती.

viii) बिनव्याजी बयाना रक्कम (EMD) रु. २०००/- चा धनाकर्ष मा. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या नावे लिफाफ्यात ठेवावा.

ix) GST नोंदणी प्रमाणपत्र व GST भरल्याची पावती.

x) आधार कार्ड क्रमांक (लागू असल्यास)

xi) अर्जदार विरुद्ध पोलीस तक्रार नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच काळ्या यादीत अंतर्भूत नसल्याचे स्वयंघोषणापत्र

xii) निविदाधारकाचे कार्यालय PMRDA/संस्था स्थापित असलेल्या मुख्यालयात असणे आवश्यक आहे.

xiii) नियम अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वयंघोषणापत्र

**(सदर प्रपत्र अ व यामध्ये नमूद कागदपत्रे लिफाफा क्र, १ मध्ये सीलबंद करावे )**

**निविदा भरणाऱ्याची:** **नाव** ..........................................................

**सही** ..........................................................

**शिक्का** ..........................................................

शासकीय तंत्रनिकेतन ,खामगाव या संस्थेतील उपहारगृहासाठी सेवा पुरवण्याबाबत

खाद्यपदार्थाचे नाव व दराचे विविरण

# प्रपत्र "ब" ( विद्यार्थी / स्टाफ )

१.अर्जदाराचे /संस्थेचे पुर्ण नाव :-

२.अर्जदाराचे /संस्थेचा पुर्ण पत्ता :-

**खाद्य पदार्थाचे नाव व दराचे विवरण पत्र**

| अ.क्र. | पदार्थाचे नाव व परिमाण | दर नमुद करावा |
|---|---|---|
| १ | चहा (६० मि.ली. १ कप ) | |
| २ | चहा (१ /२ कप ) | |
| ३ | कॉफी (६० मि.ली. १ कप ) | |
| ४ | दुध (६० मि.ली. १ कप ) | |
| ५ | ग्रीन टी /लेमन टी | |
| ६ | कोल्ड कॉफी | |
| ७ | लस्सी ( २५० मि.ली. ) | |
| ८ | समोसा ( ५० ग्रॅम ) १ नग | |
| ९ | वडा पाव ( ५० ग्रॅम ) १ नग | |
| १० | भजी ( ५० ग्रॅम ) १ | |
| ११ | पोहे ( १ प्लेट) | |
| १२ | उपमा ( १ प्लेट) | |
| १३ | शिरा ( १ प्लेट) | |
| १४ | पॅटीस (७५ ग्रॅम ) | |
| १५ | साधा डोसा | |
| १६ | उतपा | |
| १७ | मिसळ पाव ( २ पाव ) | |
| १८ | इडली सांबार ( २ नग) | |
| १९ | उडीद वडा सांबार ( २ नग) | |
| २० | पेपर डोसा | |
| २१ | आलू पराठा | |
| २२ | राईस प्लेट ( ४ चपाती , २ भाज्या , भात व डाळ ) | |
| २३ | पुरी भाजी ( ४ पुरी ) | |
| २४ | दाल राईस ( १ )प्लेट | |
| २५ | व्हेज पुलाव ( १ प्लेट) | |
| २६ | साबुदाना खिचडी (१ प्लेट ) | |
| २७ | पाव भाजी ( २ पाव ) | |
| २८ | साबुदाना ( २ वडे ) | |
| २९ | दही वडा ( २ वडे ) | |
| ३० | पाणी बाटली | |
| ३१ | दही वडा ( २ वडे ) | |
| ३२ | बिस्कीट (१०० ग्रॅ) | |
| ३३ | वेफर्स | |
| ३४ | क्रीमरोल | |
| ३५ | आईस्क्रीम | |
| ३६ | कोडल्डीक्स | |

दि. 

निविदा भरणाऱ्यांची नाव व सही व शिक्का

# स्वयंघोषणापत्र

प्रमाणित करण्यात येते कि, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव या संस्थेनी उपहारगृह सेवापुरवठा सेवेविषयी घालून दिलेल्या अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला/आम्हाला उपहारगृह सेवापूरवठा करण्याची संधी मिळाल्यास निविदेतील व करारातील अटी व शर्ती पूर्तता करण्याची जबाबदारी माझ्यावर/आमच्यावर असून त्या माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहतील, वरील अटी व शर्तीचा जर माझ्या/आमच्याकडून भंग झाला तर माझी/आमची अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन खामगाव यांना राहील. तसेच त्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई देखल करण्यास मी/आम्ही जबाबदार राहीन. तसेच उपहारगृह सेवा पूरवठा कालावधीत सेवा अंतर्गत कामगाराकडून संस्थेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाल्यास, तसेच शासकीय नियमांचे/कायद्याचे पालन न झाल्यास त्याची भरपाई करण्याची जबाबदारी माझी/आमची राहील.

ठिकाण.................... निविदाधारकाची नाव व सही ........................................

दिनांक.................... पत्ता.......................................................................

........................................................................

दूरध्वनी/मोबाईल ........................................................